PUNE RESEARCH SCHOLAR ISSN 2455-314X
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY JOURNAL VOL 4, ISSUE 3

# भारतातील लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी प्रत्यावहनाच्या तत्वाची गरज

**जयवंत पिराजी जुकरे**
सहा. प्राध्यापक,
राज्यशास्त्र विभागप्रमुख
जिजामाता कला महाविद्यालय
दारव्हा, जि.यवतमाळ.
**महाराष्ट्र भारत**

**प्रस्तावना:—**

मानवाने रानटी अवस्थेपासून ते आजतागायत प्रगती साधत असताना वेगवेगळे शासनाचे प्रकार अनुभवलेले आहेत. त्यात प्रामुख्याने हुकूमशाही, राजेशाही, महाजनशाही आणि लोकशाही इत्यादी होत, वरील अनेक शासन प्रकारापैकी दुसऱ्या महायुद्धानंतरचा जगप्रसिद्ध लोकप्रिय शासनाचा प्रकार म्हणून लोकशाही शासन प्रकाराला संपूर्ण जगभरातून मान्यता मिळालेली आहे. लोकशाही शासन प्रकाराला एवढे महत्व प्राप्त होण्याचे कारण म्हणजे, हे शासन जनतेकडून जनकल्याणासाठी चालविले जाते. यात, राज्यकर्त्याच्या इच्छेपेक्षाही जनतेची इच्छा महत्वाची मानली जाते. कोणतेही निर्णय बहुमताने घेतले जातात. अल्पसंख्याक व दुर्बल वंचित घटकाच्या विकासाला प्रथम प्राधान्य दिले जाते. म्हणून, जगातील जास्तीत जास्त नवस्वतंत्र राष्ट्रांनी लोकशाही शासन प्रणालीचा स्वीकार केलेला आहे. म्हणूनच विसाव्या शतकास 'लोकशाहीचे युग' या नावानेही ओळखले जाते. सर्व मानवजातीचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी स्वातंत्र्य ,समता, बंधुभाव, न्याय, कायद्याचे राज्य, ही मूल्ये आवश्यक असतात आणि हीच मूल्ये लोकशाही शासन प्रणालीचा महत्वपूर्ण आधारस्तंभ मानली जातात. लोकशाही शासनप्रणालीत प्रत्येक नागरिकांना त्याच्या कुवतीनुसार राजकारणात सहभागाची समान संधी मिळते, सर्व दुःखाना, तक्रारींना योग्य वाचा फोडली जाते, कोणताही निर्णय विचारविनिमय

करून घेतला जातो. लोकशाहीशासन प्रणालीत जनमताचा आदर करून शांततामय मार्गाने सत्तांतर करणे शक्य होते. यात हिसांचार, रक्तपात हाणामारी याला अजिबात स्थान नाही. भारत देशाला सर्वात मोठी लोकशाही राज्यघटना असल्याचा गौरव प्राप्त झालेला आहे. भारत देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर 26 जानेवारी 1950 रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी भारत देशाला परीणामी सर्व भारतीय नागरिकांना कायदयानुसार स्वातंत्र्य ,समता व न्यायाची हमी देणारी राज्यघटना निर्माण करून दिली. त्यांचा उद्देश देशातील प्रत्येक नागरिकाला प्रतिष्ठेने,सन्मानाने सुखी– संपन्न, एक चांगले जीवन जगता यावे, त्यांना अधिकार मिळावेत, कोणताही घटक विकासाच्या संधीपासून वंचित राहू नये हीच त्यांची मनोमन इच्छा होती. अजूनही शोषित, वंचित घटकाला पाहिजे त्या प्रमाणात न्याय मिळू शकला नाही. कारण, किमान गरजाच्या पूर्ततेशिवाय लोकशाहीला खऱ्या अर्थाने अर्थ उरणार नाही, ही वस्तुस्थिती आहे.

**प्रस्तुत शोध निबंधाची उद्दिष्ट्ये पुढीलप्रमाणे–**

प्रस्तुत शोधनिबंध लिहिण्यामागे प्रामुख्याने पुढील उद्देश आहेत.

(1) लोकशाही शासन प्रणालीची संकल्पना व त्यातील मूल्य व त्याचा आशय समजून घेणे.

(2) जनतेनी निवडून दिलेले प्रतिनिधी सामाजिक बांधीलकीच्या भावनेने वागले पाहिजेत.

(3) भारतीय राज्यघटनेचा खरा उद्देश साध्य झाला आहे किंवा नाही याचा आढावा घेणे.

(4) प्रत्यावहनाचे तत्व व त्याचा आशय समजून घेणे, आणि भारतातीय लोकशाहीत प्रत्यावहनाच्या तत्वाची किती आवश्यकता आहे, हे स्पष्ट करणे.

(5) भारतीय लोकशाहीत वरचेवर जे राजकारणाचे गुन्हेगारीकरण होत आहे, त्यासाठी उपाय सूचविणे.

(6) भारतीय लोकशाहीव्यवस्थेत सामाजिक समता, न्यायाचे स्थान कसे आहे, याचा आढावा घेणे.

**गृहितके:–**

भारत देशाला स्वातंत्र्य मिळून जवळपास सत्तर वर्ष पूर्ण होवून सुद्धा लोकशाही शासन प्रणाली अजूनही खऱ्या अर्थाने जनसामान्यापर्यंत पोहचू शकली नाही, महिलांना दलित, वंचित घटकाना आजही वेगवेगळया क्षेत्रात संधी नाकारल्या जातात. त्यांचे मोठया प्रमाणावर शोषण केल्या जाते. पाहिजे त्या प्रमाणात अजूनही सामाजिक न्याय प्रस्थापित होवू शकला नाही वर्तमान परिस्थितीत बहुतांश जनप्रतिनिधी सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून वागत नसल्याचे चित्र समाजात पहावयास मिळते.

**संशोधन विषयाचे महत्व :—**

स्वातंत्र्यानंतरच्या गेल्या 70 वर्षाच्या काळातील भारतातील लोकशाहीचा आढावा घेतल्यास प्रकर्षाने असे जाणवते की, गेल्या 20 ते 30 वर्षात जनतेनी निवडून दिलेले बहुतांश जनप्रतिनिधी सामाजिक बांधीलकीची अवहेलना करणारे, समाजहीत देशहीतापेक्षाही वैयक्तिक स्वार्थावर भर देणारे, गुन्हेगाराची पार्श्वभूमी असणारे, निवडणुकीत गैरमार्गाचा अवलंब करून निवडून येणाऱ्यांची संख्या वरचेवर वाढत आहे. भारतात कोणत्याही खात्यातील एखादा अधिकारी ,कर्मचारी ,साधा शिपाई चुकला तरी त्याला नोटिस दिली जाते किंवा पदावरून (चुकीचे स्वरूप,व्याप्ती लक्षात घेवून) काढून टाकले जाते. पण जनप्रतिनिधी चुकला, निवडणूकीत त्याने दिलेल्या आश्वासनाची पूर्तता केलेली नसेल तर प्रचंड प्रमाणावर भ्रष्टाचार केलेला असेल तर, कर्तव्याकडे दुर्लक्ष केलेले असेल तर मात्र कोणतीही शिक्षा नाही, ही विसंगती वाटते या पार्श्वभूमीवर ज्याप्रमाणे स्विसच्या लोकशाही शासनप्रणालीत जसे प्रत्यावहनाचे तत्व अस्तित्वात आहे त्याच धर्तीवर भारतातही लोकशाही शासनप्रणालीच्या यशस्वीतेसाठी प्रत्यावहनाच्या तत्वाची नितांत आवश्यकता आहे. या प्रत्यावहनाच्या तत्वामुळे जनप्रतिनिधीच्या मनमानी वागण्याला निश्चितच आवर बसेल, आणि लोकशाही सुदृढ होण्यास मदत होईल असे, प्रकर्षाने वाटते.

**संशोधन पद्धती व स्रोत :—**

प्रस्तुत शोधनिबंध लिहिताना प्रमुख्याने सामाजिक सर्वेक्षण पद्धती, निरीक्षण पद्धत, अनुभव पद्धत, विद्यार्थी प्रश्नावलीद्वारा माहिती संकलित करून निष्कर्ष मांडण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे. शिवाय दुय्यम साधन सामुग्रीचा वापर करण्यात आलेला असून त्यात

प्रामुख्याने संदर्भ ग्रंथ, अभ्यासक्रमिक पुस्तके, गाव पातळवरील चावडीतून झाालेल्या जनसामान्यांच्या चर्चा, शिक्षक, प्राध्यापक, विद्यार्थीवर्ग, विविध वर्तमान पत्रे, मासिके प्रसारमाध्यमे इ. माध्यमातून मिळालेल्या आकडेवारी व माहितीचा आधार घेण्यात आलेला आहे.

**लोकशाहीचा अर्थ व संकल्पनाः–**

आजपर्यंतच्या उपलब्ध शासनप्रकारापैकी एक आदर्श शासनाचा प्रकार म्हणून लोकशाही शासन प्रकाराला अनन्यसाधारण असे महत्व आहे. **''लोकशाही हा शासनाचा प्रकार बुलेटने नव्हे तर बॅलेटने अस्तित्वात येणारा शासनाचा प्रकार होय.''** यात कोणाचेही किंचीतही रक्त न सांडता शांततेच्या मार्गाने सत्ता परिवर्तन करणे शक्य आहे. नाहीतर इतर शासन प्रकारात सत्तांत्तर करण्यासाठी प्रचंड प्रमाणावर रक्तपात, हिंसा होते. पण, लोकशाही शासनप्रकारात मात्र तसे होत नाही. लोकशाही शासनप्रणालीच्या काही विचारवंतानी केलेल्या व्याख्या पुढीलप्रमाणेः–

1. अब्राहम लिंकनच्या मतेः–

   अब्राहम लिंकन यांना गुलामांचे मुक्तिदाते म्हणून ओळखले जाते. अमेरिकन प्रेसिडेन्ट अब्राहम लिंकननी लोकशाहीची केलेली व्याख्या जगप्रसिद्ध आहे. त्यांच्या मते – ''लोकांनी, लोकांसाठी, लोकांकडून चालविलेले सरकार म्हणजे लोकशाही होय.''

2. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेली लोकशाहीची व्याख्याः– ''लोकांच्या राजकीय, सामाजिक जीवनात रक्ताचा एकही थेंब न सांडता क्रांतीकारी बदल घडवून आणणे म्हणजे लोकशाही होय.''
3. प्रा.जॉन सिले या विचारवंताच्या मते, '' ज्या शासनप्रकारात प्रत्येकाला सहभागी होता येते असा शासनाचा प्रकार म्हणजे लोकशाही होय.''

4. लॉर्ड ब्राईस या विचारवंताच्या मतेः– " लोकशाही हा एक असा शासनाचा प्रकार आहे की,ज्यामध्ये राज्याची सत्ता एका किंवा आधिक वर्गाच्या हाती नसून ती सत्ता संपुर्ण लोकसमुदायाकडे दिलेली असते.

थोडक्यात, लोकशाही म्हणजे प्रौढ मताधिकाराच्या आधारे खुल्या व निःपक्ष वातावरणातील निवडणुकांद्वारे लोकांनी निवडून दिलेल्या प्रतिनिधीद्वारे चालणारे राज्य म्हणजे लोकशाही होय. लोकशाही शासनप्रणालीचे अंतिम उद्‌दिष्टये जनतेचे कल्याण हे असते. तो केवळ शासनाचा प्रकार नसून ती एक सहजीवनाची पद्धती होय. ( Way of Life ) आणि एकूणच लोकशाही शासन पद्धतीमुळे व्यक्तीच्या सुप्तशक्तीचा विकास होवून समाजात सामाजिक न्याय प्रस्थापित होतो.

**भारतीय लोकशाहीसमोरील प्रमुख अडथळेः–**

भारताच्या लोकशाहीसमोर पुढील अनेक अडथळे असल्याचे निर्दशनास येते.

**1. भ्रष्टाचार :–**

भारतीय लोकशाही समोरील सर्वात मोठा अडथळा म्हणजे भ्रष्टाचार हा होय. भारतात आज असे एकही क्षेत्र,एकही खाते उरले नाही की जिथे भ्रष्टाचार पोहचलेला नसेल. अगदी घटनात्मक पदे सुद्धा भ्रष्टाचारापासून अलिप्त राहू शकली नाहीत. सर्वोच्च न्यायालयातील न्यायधिशाला सुद्धा महाभियोगाच्या खटल्याला तोंड द्यावे लागलेले आहे. राजकारणात तर भ्रष्टाचाराचे प्रमाण फारच वाढलेले आहे अगदी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका सुद्धा कोटीच्या घरात जात आहेत. पैसा लावून सत्ता मिळविणे व सत्ता मिळाल्यानंतर पुन्हा अमाप पैसा काढून घेणे, सत्ता टिकवून ठेवण्यासाठी पैसा खर्च करणे हे जणु समिकरणच बनलेले आहे.

**2.जनप्रतिनिधीकडे सामाजिक बांधिलकीचा अभावः–**

भारताच्या लोकशाही समोरील आणखी एक अडथळा म्हणजे जनप्रतिनिधींना जनतेचे व त्यांच्या समस्येचे काही घेणे देणे राहिलेले नाही. लाखो–करोडो रूपये खर्च करून राजकारणात गेलेल्या जनप्रतिनिधीकडून सर्वसामान्य जनता काय अपेक्षा करणार ? निवडणुकीच्या अगोदर जसा मी जसा काही सच्चा देशभक्त आहे आहे? मी सत्तेत

आल्यानंतर सर्व समस्या दूर करीन, मनोभावे जनतेची सेवा करीन, असे चित्र उभे केले जाते. मग सत्ता मिळाल्यानंतर साधे ढुंकूनही पाहीले जात नाही.

**3.राजकारणात गुन्हेगारी प्रवृत्तीचा वाढता प्रभाव :–**

वर्तमान परीस्थितीत भारतीय लोकशाहीत राजकारणचे गुन्हेगारकरण व गुन्हेगाराचे राजकारण मोठया प्रमाणावर वाढल्याचे चित्र पाहवयास मिळते. गुंडागिरीला सर्वच पक्ष बळी पडलेले आहेत. सुवातीला आश्रय म्हणून गुंड लोकांचा आश्रय घेण्यात आला. आता तर सत्ताच त्यांच्या हाती गेली. गुंडाविरूध्द गुंड म्हणून प्रतिस्पर्धी पक्षही गुडांना उमेदवारी देवून निवडणूक जिंकण्याचा प्रयत्न करतो. यातून गुंडाना राजकीय प्रतिष्ठा प्राप्त झाल्याचे चित्र समाजात पहावयास मिळते.

**4.पक्षांतर व स्वार्थी प्रवृत्तीची लालसा:–**

भारत देशात साधारणतः 1967 ते 70 च्या दशकापासून पक्षांतराची प्रवृत्ती मोठया प्रमाणावर वाढीस लागली आहे, लोकशाही शासनपद्धतीत पाच वर्षासाठी निवडून दिलेला जनप्रतिनिधी हा जनतेला जबाबदार असावा असा राजकीय संकेत आहे. पण हा संकेत भारताच्या राजकीय व्यवस्थेत रूजला नाही. जनप्रतिनिधी एखादया पक्षाच्या तिकिटावर निवडून जातो; मग पक्षांतर करून अमाप पैसा, सत्तेतील विविध पदे, मग दुसऱ्या पक्षासोबत सौदेबाजी असे चित्र पाहवयास मिळते. पक्षांतर बंदी कायदा अस्तित्वात आहे. पण त्यातूनही अनेक पळवाटा शोधल्या जातात.

**5. नाती– गोती संबध आणि जात धर्म याचा आधार:–**

भारतीय राजकारणातील सर्वच पक्षाचा मागोवा घेतल्यास असे जाणवते की, सर्व पक्षात नात्या गोत्याच्याच लोकांचा जास्त भरणा आहे. शिवाय, एकाच कुटुंबातले वेगवेगळे सदस्य वेगवेगळया पक्षात आहेत. मग काय सत्ता त्यांच्या कुटुंबात राहते. निवडणूक आयोगाची कितीही बंधने असली तरी तज्ञ वकिलांचा सल्लाघेवून एखादा कायदा होतो न होतोत्यासाठी हजारो पळवाटा शोधल्या जातात. राजकीय पक्षाकडूनही पक्षाचे तिकिट देतानां जात, धर्म, एखादया व्यक्तीची निवडणूकीत पैसे खर्च करण्याची कुवत इ. बाबी लक्षात घेवूनच

उमेदवारी दिली जाते परिणामी चारित्र्यसंपन्न, बुद्धीमान, गरीब सर्वसामान्य लोक राजकारणासून चार हात दूर आहेत.

**6. प्रभावी विरोधी पक्षाचा अभाव :–**

कोणत्याही लोकशाही शासन प्रणाली असलेल्या राष्ट्रात सत्ताधारी पक्षाबरोबरच विरोधी पक्षालाही अंत्यत महत्वपूर्ण स्थान असते. बहुमताने निवडून आलेला पक्ष सत्ताधारी पक्ष म्हणून काम पहातो तर अल्पमतात असलेला पक्ष विरोधी पक्ष म्हणून काम पाहतो. या विरोधी पक्षाचे मुख्य काम म्हणजे सत्ताधारी पक्षावर प्रभावीरित्या नियंत्रण ठेवणे, त्यांच्या राज्यकारभारातील दोष जनतेच्या निदर्शनास आणून देणे. पण, भारतात कोणता पक्ष सत्ताधारी ? व कोणता पक्ष विरोधी? हेच समजत नाही. पाश्चिमात्य राष्ट्रात विरोधी पक्ष प्रबळ असतात पण, भारतात मात्र तसे दिसून येत नाही.

अशा प्रकारे वरील अनेक समस्या भारतीय लोकशाहीसमोर असल्याचे चित्र दिसून येते.

**पत्यावहनाचे तत्व संकल्पना व आशय :–**

लोकनिर्वाचीत प्रतिनिधीवर व त्यांच्या कार्यावर जनतेचे नियंत्रण असल्याशिवाय ते जबाबदारीने लोककल्याणाची कामे करणार नाहीत.निवडणूकीनंतर ठराविक काळापर्यंत त्याला पदावर राहण्याची शाश्वती असल्यामुळे ते अकार्यक्षम,बेजबाबदार बनतील.जनप्रतिनिधीवर नियंत्रण ठेवण्याचा सर्वोत्कृष्ट मार्ग म्हणजे प्रत्यावहनाचे तत्व हे होय, यालाच आवर्तन या नावानेही ओळखले जाते. की सद्यस्थितीत फक्त स्विसच्या प्रत्यक्ष लोकशाही व्यवस्थेत अस्तित्वात आहे. प्रत्यावहनाचे तत्व म्हणजे जनतेनी निवडून दिलेली प्रतिनिधी त्यांच्या कालावधीत बेजबाबदारपणे वागत असतील जनहिताकडे दुर्लक्ष करीत असतील तर त्यांचा कार्यकाल संपण्यापूर्वीच परत बोलविण्याचा अधिकार जनतेला असणे म्हणजेच 'प्रत्यावहन (Re-Call ) होय.' मतदारानां आपला प्रतिनिधी योग्यरितीने कार्य करीत नाही असे दिसून आल्यास विशिष्ट मतदाराच्या संख्येने त्याला पदावरून दूर करण्याची मागणी विधीमंडळाकडे करता येते. त्यानुसार त्यांचे प्रतिनिधीत्व रद्द होवू शकते. स्विसमधील जनता त्यांनी निवडून दिलेले प्रतिनिधी त्यांच्या कार्यकाळात चुकीचे वागत असेल तर मिळालेल्या सत्तेचा वापर स्वार्थासाठी करीत असेल तर त्यांचा कार्यकाळ संपण्यापूर्वीच परत बोलावते. त्यामुळे जनप्रतिनिधी आपली

खुर्ची जाईल या भितीपोटी मनमानी रितीने वागू शकत नाहीत. तर, सामाजिक बांधीलकीच्या भावनेने वागतात. भारतात मात्र तशी सोय नाही. एकदा आपण एखादा जनप्रतिनिधी निवडून दिला की, किमान पाच वर्ष जनतेला काहीही करता येत नाही. मग तो कसाही वर्तन करो? कितीही भ्रष्टाचार करो.? की जे अत्यंत चुकीचे ठरते. या पार्श्वभूमीवर भारतात प्रत्यावहनाच्या तत्वाची नितांत आवश्यकता जाणवते. .

**निष्कर्ष** :–

भारतीय लोकशाही संदर्भात थोडक्यात असे म्हणता येईल की,

1. सद्यस्थितीत भारतीय लोकशाहीला उतरती कळा लागलेली असून डॉ. बाबासाहेब आंबेडकर म. गांधी, पं. नहरू सर्व थोर हुतात्मे यांना अपेक्षित असलेल लोकशाही अजूनही अस्तित्वात आलेली नाही.
2. वर्तमान भारतीय लोकशाहीत लोकमताची अवहेलना तथा धिक्कार होताना दिसून येतो. नुकतेच भारताच्या सर्वोच्च न्यायालयातील कांही न्यायधिशानी भारतीय लोकशाही धोक्यात येत असल्याचे मत व्यक्त केलेले आहे.
3. भारताच्या लोकशाहीत विशिष्ट गटाचे हित जपण्यासाठी बहुमताचा सर्रासपणे बळी दिला जातो. सामाजिक व आर्थिक लोकशाहीकडे दुर्लक्ष झाल्याचे दिसून येते.
4. पक्षांतर व बंडखोरी मोठया प्रमाणावर वाढलेली असून केवळ स्वार्थासाठी विरोध वाढलेला आहे. पैसे घेवून संसदेत खासदाराकडून प्रश्न विचारले जातात. आता तर न्यायव्यवस्थेतीलही वाद चव्हाटयावर येत आहेत.
5. भारतीय राजकारणाचे उत्तरोत्तर मोठया प्रमाणावर गुन्हेगारीकरण वाढत असून सर्वसामान्य व्यक्तींना (काही अपवाद सोडून) राजकारणात फारसे स्थान मिळत नसल्याचे प्रकर्षाने जाणवते.

**शिफारसो व समारोप** :–

या प्रत्यावहनाच्या तत्वामुळे भारतातील लोकशाही संपूर्ण दोष रहीतच होईलच (अगदी, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना जशी अभिप्रेत होती तशी) असे नाही पण या तत्वाच्या अंमलबजावणीमुळे लोकशाही शासनप्रणालीतील दोष निश्चित कमी होतील

जनप्रतिनिधीच्या मनमानी वागण्याला, बेजबाबदार वागण्याला निश्चितच आवर बसेल, आपली खुर्ची जाईल ? या भितीपोटी जनप्रतिनिधी सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून वागतील स्वार्थाऐवजी जनहिताचाही प्रकर्षाने विचार करतील. आणि, हळूहळू भारतात लोकशाही मजबूत होत जाईल, अशी आशा वाटते. त्यासाठी पुढील काही महत्वपूर्ण शिफारसी सूचविण्यात येतात.

1. सर्व दोष जनप्रतिनिधीचाच नसून देशातील प्रत्येक नागरिकांनी सुद्धा जबाबदारीने , विचारपुर्वक,सद्सदविवेकबुद्धी जागृत ठेवून, कोणत्याही छोटया – मोठया प्रलोभनाला बळी न पडता निर्भयपणे मतदान करावे. मतदान न करण्याची मानसिकता प्रथमतः दूर करावी.

2. प्रत्यावहनाच्या तत्वाची प्रत्याक्षात अमलबजावणी झाल्यास सर्वच जनप्रतिनिधीमध्ये सामाजिक बांधिलकीची भावना निर्माण होवून स्वार्थापेक्षाही समाजसेवेला, देशसेवेला ते वाहून घेतील.

3. भारतात राजकीय लोकशाहीपेक्षाही सामाजिक लोकशाही निर्माण होणे अंत्यत गरजेचे वाटते कारण, सुशिक्षित समाजात जातीयतेची भावना वरचेवर वाढीस लागत आहे. मुळात दलित, महिला, मागासवर्गीय जनता यांच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोण अजूनही फारसा बदललेला नाही. परिणामी, समाजाचे ऐक्य पूर्णपणे नष्ट झालेले आहे. उदाहरणार्थ पुणे येथील भोसले बाईचे स्वयंपाक प्रकरण, भिमा कोरेगाव जातीय दंगल प्रकरण.

4.राजकारणात नितीमत्ता (Political Ethics) निर्माण करणे गरजेचे काळाची गरज बनलेली आहे.कारण प्रत्यक्ष निर्णयज्या घटकाकडून घेतले जातात, कायदे केले जातात. त्याच लोकाकडे नितीमत्ता नसेल तर बाकीच्या बाबीना फारसा अर्थ उरणार नाही.

5. देशातील सर्व मतदार वर्ग नेहमी जागरूक असणे, डोळसपणे मतदान करणे, हे सुद्धा तितकेच महत्वपुर्ण ठरते. जात,पात धर्म व्यक्तीगत स्वार्थ याच्या पुढे जावून रातकीय प्रक्रियेत सहभाग घेणे महत्वाचे ठरते.

6. प्रसारमाध्यमांना लोकशाही शासनप्रणालीचा चौथा आधार स्तंभ मानला जातो. म्हणून ते सुद्धा कोणत्याही प्रलोभणाला बळी न पडता लोकशाहीतील सत्य जनतेसमोर मांडले पाहिजे, जनतेचे राजकीय सामाजिकरण करण्यात सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून योगदान देणे आवश्यक झालेले आहे.

## संदर्भ ग्रंथ :


1. डॉ.बाबसाहेब आंबेडकराचे लोकशाही विषयक चिंतन , डॉ. भालचंद्र फडके.
2. तुलनात्मक शासन आणि राजकारण, प्रा.डॉ. जोगेंद्र गवई व प्रा.शेख हाशम.
3. तुलनात्मक शासन आणि राजकारण, प्रा.डॉ. श्रीराम येरणकर
4. राजकीय सिंद्धात, प्रा.डॉ. जोगेंद्र गवई व प्रा.शेख हाशम.
5. डॉ.बाबसाहेब आंबेडकर यांचे विचारधन,दीक्षित म.श्री.,रधुवंशी प्रकाशन पुणे 1986
6. भारतीय राजकीय विचारवंत, डॉ.भा.ल.भोळे, पिंपळापुरे बुक डिस्ट्रीब्युटरर्स नागपूर 2011
7. लोकशाहीची प्रक्रिया आणि राजकीय मानसिकता,यशवंतराव चव्हाण महा.मुक्त विद्यापीठ नाशिक.
8. आधुनिक भारतीय राजकीय विचारवंत,प्रा. अरविंद श्रृंगारपूरे, मंगेश प्रकाशन नागपूर
9. राजकीय सिंद्धात,प्रा.सुधाकर कुलकर्णी,अरूणा प्रकाश